# उच्च शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते- प्र.कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन





देगलूर – देगलूर महाविद्यालय, देगलूर अंतर्गत पदवी- पदव्युत्तर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी २४ वा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ २६ जुलै २०२२ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ.जोगेंद्रसिंग बिसेन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उच्च शिक्षणामुळे माणसाचे व्यक्तिमत्व समृद्ध होते. त्यामुळे मानवाच्या जीवनात शिक्षणाला खूप महत्व असून चांगला माणूस घडविणे ही शिक्षण व्यवस्थेची जबाबदारी आहे.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावण्यासाठी आंतरविद्याशाखीय पदवी चा काळ आला आहे. प्राचीन भारतात नालंदा व तक्षशिला ही दोन विद्यापीठे जगप्रसिद्ध होती.म्हणून भारताला शिक्षणाची वैभवशाली परंपरा राहिली आहे. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांनी आभाळातील चंद्राचा जरूर आग्रह धरावा, गरूडा प्रमाणे उंच भरारी मारावी परंतु जमिनीशी असलेले नाते कधीही विसरू नये .असे प्रतिपादन याप्रसंगी त्यांनी केले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ हे होते अध्यक्षीय समारोप करताना पदवी स्वीकारण्याच्या क्षण हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील आनंदाचा क्षण असतो. पदवी मिळविणे ही जीवनाची पहिली पायरी आहे. पदवी प्राप्त केल्यानंतर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यश मिळवणे आवश्यक आहे. आज ही आपल्या देशातील उच्च शिक्षणाचे प्रमाण २७.१० टक्के असून उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेंम्बरेकर, सचिव श्री शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष श्री नारायणराव मैलागिरे, सहसचिव श्री सूर्यकांत नारलावर, कोषाध्यक्ष श्री विलास तोटावार, कार्यकारणी सदस्य श्री राजकुमार महाजन, श्री जनार्दन चिद्रावार, श्री रवींद्र आप्पा ध्याडे, स्वरातीम विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.अशोक टिपरसे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, परीक्षा विभागाचे प्रमुख डॉ.राजेश्वर दुडूकनाळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य डॉ. संजय पाटील, डॉ. सरजेराव रणखांब, डॉ.किशन सुनेवाड, डॉ. सुदाम लक्ष्मण कुमार, श्री राजू जंगिलवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मिरवणुकीने झाली. दीप प्रज्वलन आणि स्वामीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विद्यापीठ गीताने समारंभ प्रारंभ झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिक्षा विभागाचे

पान ४ वर >>